**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**व्यवस्थापन परिषदेच्या तिसाव्या सभेचा कार्यवृत्तांत**
**गुरुवार, दि.०६ जानेवारी, २०११ दुपारी १:०० वा.**

**व्यवस्थापन परिषदेची तिसावी सभा गुरुवार, दि.०६/०१/२०११ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. (डॉ). पाटील टी. आर. | सदस्य |
| ४) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. संचालक म. व वि .वि. मंडळ | सदस्य |
| ६) | प्राचार्य पवार एस. के. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| १०) | डॉ. श्रीमती यजमान्य एस. आर. | सदस्य |
| ११) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १२) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १४) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १५) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १६) | डॉ. साळुंखे डी. जे. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १७) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १८) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

डॉ. कदम बी. बी. शिक्षण सहसंचालक (मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांचे प्रतिनिधी) यांनी या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले. याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी निवडून आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.३१ ऑगस्ट, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

ठराव : **दि.३१ ऑगस्ट, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यालयीन कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ २ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव :** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ]** **सोलापूर विद्यापीठाच्या विस्तारासाठी नव्याने संपादित करण्यात आलेल्या जमिनीची नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या रकमेशिवाय लागणारी जास्तीची रक्कम रु.१,४१,५९,१५८/- इतकी भरणा केल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी- सोलापूर विद्यापीठाच्या विस्तारासाठी नव्याने संपादित करण्यात आलेल्या जमिनीची नुकसान भरपाई देण्यासाठी एकूण रक्कम रु.९,४१,५९,१५८/- द्यावी लागत होती. यापैकी मा. विशेष भूमी संपादन अधिकारी क्र-१, सोलापूर यांच्याकडे एकूण रक्कम रु.४,५३,००,०००/- भरणा केलेली आहे. उर्वरीत रक्कम रु.४,८८,५९,१५८/- जमा करण्याबाबत मा. विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. १ यांनी कळविले आहे.

परंतु संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी शासनाकडून रु.८,०३,००,०००/- रक्कम मंजूर झाल्याने उर्वरित रक्कम रु.१,४१,५९,१५८/- ही रक्कम विद्यापीठाच्या फंडातून भरणा करावी लागणार आहे. शासनाच्या मंजूर रकमेपैकी रु.३,००,०००/- इतकी रक्कम मोजणी फी म्हणून मा. विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. १ सोलापूर यांना आदा करण्यात आलेली आहे.

रु.१,४१,५९,१५८/- इतकी रक्कम मा.विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१ सोलापूर यांच्याकडे भरणा करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिली आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठरावः** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ]** **सोलापूर विद्यापीठाच्या वापरात असलेल्या विद्युत कनेक्शनच्या क्षमतेत ६५ किलो वॅट ऐवजी १२५ किलो वॅट एवढी वाढ करण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः विद्यापीठाच्या वापरात सध्या ६५ किलो वॅटचे विद्युत कनेक्शन असून त्याचा विद्युत ग्राहक क्रमांक- ३३०३९९०५००१० असा आहे. विद्यापीठाच्या विस्तारात वाढ होत असल्याने वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या ६५ किलो वॅट ऐवजी १२५ किलो वॅट इतक्या विद्युत क्षमतेत वाढ करण्यासाठी होणा-या संभाव्य खर्चाचा तपशील सोलापूर विद्युत मंडळ या कार्यालयाकडून मागणी करण्यात आला होता.

त्यानुसार मा.अधीक्षक अभियंता, सोलापूर विद्युत मंडळ, सोलापूर यांच्या कार्यालयीन पत्र क्र.८५७६, दि.६ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या पत्रान्वये विद्युत कनेक्शनच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी खाली नमुद केल्याप्रमाणे रु.१,९३,४५०/- इतका खर्च अपेक्षित असून सदरची रक्कम दि.८/१२/२०१० पर्यंत भरण्याबाबत कळविले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Fixed Service connection charges | Rs | 15000-00 |
| 2 | Supervision Charges 1.3 % | Rs | 3400-00 |
| 3 | Additional Security Deposit | Rs | 174850-00 |
| 4 | Agreement Bond Charges | Rs | 200-00 |
| | TOTAL | Rs | **1,93,450-00** |

विद्युत कनेक्शनच्या क्षमतेत वाढ करण्याबाबत डॉ. पी. बी. जोशी व डॉ. व्ही. बी. पाटील या दोन तज्ञ सल्लागारांकडून दि. २३ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आलेला होता. त्यानुसार संबंधितांनी अभिप्राय दिलेला आहे. रु.१.९३,४५०/- दि.०८/१२/२०१० पूर्वी विद्युत मंडळास भरणा करण्याचे असल्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) नुसार मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिली आहे. मान्यतेनंतर दि.०८/१२/२०१० रोजी विद्युत मंडळास ही रक्कम भरणा केलेली आहे.

मा.कुलगुरुमहोदंयानी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठरावः** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ] सोलापूर विद्यापीठासाठी संपादित करण्यात आलेल्या ४८२ एकर जमिनीत पाझर तलाव करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी- सोलापूर विद्यापीठासाठी संपादित करण्यात आलेल्या ४८२ एकर जमिनीत पाझर तलावाची साईट उपलब्ध असल्याचे लघु पाटबंधारे [स्था.स्तर] उपविभाग, सोलापूर यांनी त्याचे कार्यालयीन पत्र क्र. ५६२, सन २०१०अन्वये विद्यापीठास कळविले होते.

सपादित जागेत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाकडून पाझर तलाव करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी विद्यापीठ कार्यालयाकडील ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत संबंधित विभागाने विनंती केली होती. लघु पाटबंधारे [स्था.स्तर] उपविभाग, सोलापूर यांच्या मागणीनुसार ना हरकत प्रमाणपत्र त्वरित देणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) नुसार मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. मान्यतेनंतर लघु पांटबंधारे [स्था.स्तर] उपविभाग, सोलापूर यांना दि.४/१२/२०१० रोजी ना हरकत प्रमाणपत्र पाठविण्यात आले आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठरावः मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०६ ] विद्यापीठासाठी कुरिअर सेवा वार्षिक दर करार करण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः विद्यापीठाच्या टपालाची सेवा देण्याकरिता कुरिअर सेवा वार्षिक दर करार करण्याच्या कामाकरिता दैनिक पुण्य नगरी मध्ये दि.१६/०९/२०१० रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन दि.३०/०९/२०१० रोजी दुपारी १२ पर्यंत निविदा विक्री व निविदा स्वीकृती ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण चार निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदा दि.१४/१०/२०१० रोजी दुपारी ३ वाजता खरेदी समिती सदस्यांसमोर उघडण्यात येवून निविदाधारकासोबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीनंतरच्या दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार विद्यापीठाला ज्या ज्या वेळेस कुरिअर सेवा आवश्यक असेल त्या वेळेस मे. तेज कुरिअर, सोलापूर यांची सेवा घेण्यास मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव).

**ठरावः मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०७ ]** **ग्रंथालय समितीच्या दि.१५/०९/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतावर मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: दि.१५/०९/२०१० रोजी दुपारी ३ वाजता ग्रंथालय समितीची सभा झाली. या सभेत वार्षिक अहवाल, पुस्तके व नियतकालिके खरेदी तसेच वार्षिक इ. विषय विचारार्थ होते. ग्रंथालय समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (c) (iii) आणि (iv) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू नवीन व्यवस्थापन परिषद गठीत झालेली नसल्याने व पुस्तके व नियतकालिके खरेदी करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरुमहोदंयानी ग्रंथालय समितीच्या दि.१५/०९/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव).

**ठराव:** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०८ ]** **सहाव्या दीक्षांत समारंभात ऑक्टो/नोव्हें २००९ व मार्च/एप्रिल २०१० च्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या स्नातकांना पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९६(१) नुसार पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"The Management Council may institute and confer such Degrees/Diplomas Certificates and other academic distinctions as may be recommended by the Academic Council."

या तरतूदीनुसार विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३० (२) (a) नुसार शिफारस करण्याची आहे. याबाबत विद्यापरिषदेच्या दि.२० डिसेंबर, २०१० रोजीच्या सभेतील विषय क्र. ०८ वर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे :

**"ही विद्यापरिषद व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, पात्र स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्यास अनुमती द्यावी".**

विद्यापरिषदेची सदरची शिफारस विचारार्थ).

**ठराव:** **सहाव्या दीक्षांत समारंभात ऑक्टो/नोव्हें २००९ व मार्च/एप्रिल २०१० च्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या स्नातकांना पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] बी. एड. सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीचा सुधारीत अध्यादेश क्र. १५ मध्ये परीक्षा वेळ १.३० ऐवजी २ तास करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी** - शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत बी. एड. (सत्र पध्दती) या कोर्ससाठी अध्यादेश तयार करुन, विविध विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेने, सदरचे अध्यादेश यापूर्वी मा. कुलपती कार्यालयाकडे मान्यतेस्तव सादर केलेले होते.

दि.२०/१२/२०१० रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४३ नुसार अध्यादेश क्र.१५ मध्ये बी. एड. सत्रपध्दती अभ्यासक्रमासाठी परीक्षा वेळ १.३० ऐवजी २ तास अशा दुरुस्तीसह सुधारीत केलेला अध्यादेश क्र.१५ व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेला आहे.

विद्यापरिषदेने अध्यादेश क्र. १५ मध्ये दुरुस्तीसंदर्भात केलेली शिफारस महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (c) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः बी. एड. सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीच्या सुधारीत अध्यादेश क्र.१५ मध्ये परीक्षा वेळ १.३० ऐवजी २ तास करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] कला व ललित कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत सत्र पध्दती अभ्यासक्रमाबाबत सुधारीत केलेला अध्यादेश क्र.१२ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी** - शै. वर्ष २०१०-११ पासून पदव्युत्तर कोर्सचा सत्र पध्दती अभ्यासक्रम सुरु आहे. या कोर्सच्या अभ्यासक्रमाकरीता तयार करण्यात आलेला अध्यादेश क्र.१२ विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेने, मा. कुलपती कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला होता.

मा. अधिष्ठाता कला व ललित कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांनी अध्यादेश क्र. १२ यातील O.M.A.3 (a), (b), (e) (Standard of Passing) मध्ये दि. ३/१२/२०१० रोजीच्या पत्रान्वये विद्याशाखेच्यावतीने सुधारीत केलेले अध्यादेश स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले होते.

विद्यापरिषदेच्या दि.२०/१२/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.४६ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत केलेले अध्यादेश व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहे.

विद्यापरिषदेने सुधारीत अध्यादेश क्र.१२ बाबत केलेली शिफारस महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (c) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः कला व ललित कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत सत्र पध्दती अभ्यासक्रमाबाबत सुधारीत केलेला अध्यादेश क्र.१२ बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] परीक्षा मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३१ (३) (e) नुसार अधिष्ठाता नाही असा प्राचार्य व ३१ (३) (f) नुसार प्राचार्य व विद्यापीठ अधिविभागाकडील विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्याव्यतिरिक्त एका शिक्षकाचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणी: परीक्षा मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३१ (३) (e) नुसार अधिष्ठाता नाही असा प्राचार्य व ३१ (३) (f) नुसार प्राचार्य व विद्यापीठ अधिविभागाकडील विभागप्रमुख यांच्याव्यतिरिक्त एका शिक्षकाचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करण्याचे आहे.

दि.१४ सप्टेंबर २००९ रोजीच्या शासन आदेशानुसार, ३१ (३) (e) नुसार नामनिर्देशन करावयाच्या प्राचार्यासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

1. Other than Dean.
2. Shall possess Ph.D. degree, unless appointed before 13/10/2000.
3. Minimum 5 years experience as Principal.
4. Minimum 15 years experience of teaching.
5. Having worked for atleast 5 times as Paper Setter / Examiner / Moderator / Chairman / Co-ordinator of CAP at University exams.

दि.१४ सप्टेंबर २००९ रोजीच्या शासन आदेशानुसार, ३१ (३) (f) नुसार नामनिर्देशन करावयाच्या शिक्षकासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

1. Other than Heads of University Departments or Principals.
2. From University Department / University Institution.
3. With 10 years PG teaching experience.
4. Who is not a Head / Director of University Department / Institution.
5. If not available then at least 5 years PG teaching experience.
6. Shall possess Ph.D. degree.
7. Having worked as a Paper Setter / Examiner / Co-ordinator / Moderator at University Examination.
8. Published minimum 3 Research Papers in peer reviewed / referred National / International research Journals.
9. Shall be a Ph.D. guide.

वरीलप्रमाणे नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव:** **१) प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्राचार्य पवार एस. के. यांनी अनुमोदन दिले.**

**२) डॉ. शिळीमकर टी. एन. यांनी डॉ. बचुटे एम. टी. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. कदम एस. डी. यांनी अनुमोदन दिले.**

**इतर कोणतेही नाव न सुचविण्यात आल्याने परीक्षा मंडळावर ३१ (३) (e) नुसार प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. यांचे व ३१ (३) (f) नुसार डॉ. बचुटे एम. टी. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १२ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (f) नुसार एका शिक्षकाचे व ३५ (२) (g) नुसार एका प्राचार्याचे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर नामनिर्देशन करण्यास्तव.**

(टिपणी :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - मध्य उप - विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि. १८ ऑगस्ट २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या विविध अधिकारमंडळांचा कार्यकाल दि.३१/०८/२०१० रोजी संपुष्टात आलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (f) अन्वये सोळा वर्षापेक्षा कमी अनुभव नसलेल्या एका शिक्षकाचे व ३५ (२) (g) नुसार विद्यापरिषदेवर प्राचार्य म्हणून सदस्य असलेल्या प्राचार्यांपैकी कला, विज्ञान किंवा वाणिज्य महाविद्यालयाच्या एका प्राचार्याचे व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन करण्याची तरतूद आहे.

दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन आदेशानुसार ३५ (२) (f) नुसार नामनिर्देशन करावयाच्या शिक्षकासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

1. Imparting Under Graduate Teaching.
2. Not less than 16 years of teaching experience.
3. Shall possess Ph.D. degree.
4. Having worked for alteast 5 times as Chairman / Paper Setter / Moderator / Exam Co-ordinator at University level appointed by University.

दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन आदेशानुसार ३५ (२) (g) नुसार नामनिर्देशन करावयाच्या शिक्षकासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

1. Of an Affiliated College of Arts, Science or Commerce. From amongst Principals who are members of Academic Council.
2. Shall possess Ph.D. degree, unless appointed before 13/10/2000.
3. Minimum 5 years experience as Principal.
4. Minimum 15 years experience of teaching.
5. Having worked for atleast 5 times as Paper Setter / Examiner / Moderator / Chairman / Co-ordinator of CAP at University Exams.

या तरतूदीनुसार नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव:** **१) प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी डॉ. देसाई आर. व्ही. यांचे नाव सुचविले आणि त्यास श्री. गायकवाड बी. आर. यांनी अनुमोदन दिले. तसेच डॉ. कदम एस. डी. यांनी प्रा. पिरगोंडे बी. आर. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. सुर्यवंशी ए. बी. यांनी अनुमोदन दिले. शिक्षकाच्या नामनिर्देशनाकरीता प्रा. पिरगोंडे बी. आर. व डॉ. देसाई आर. व्ही. अशी दोन नावे सुचविण्यात आल्याने गुप्त मतदान घेण्यात आले. मतदानानुसार डॉ. देसाई आर. व्ही. यांना ७ मते तर प्रा. पिरगोंडे बी. आर. यांना ६ मते मिळाली त्यानुसार डॉ. देसाई आर. व्ही. यांचे नामनिर्देशन झाले.**

**२) प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले.**

**प्राचार्यांच्या नामनिर्देशनाकरीता इतर कोणतेही नावे सुचविण्यात न आल्याने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर ३५ (२) (g) नुसार प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १३ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५० (२) (b) नुसार स्थायी समितीवर तीन सदस्यांचे ज्यापैकी एक महिला संस्था प्रतिनिधी व शिक्षक नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५० (२) (b) नुसार स्थायी समितीवर व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून तीन सदस्यांचे ज्यापैकी एक महिला संस्था प्रतिनिधी व एक शिक्षक नामनिर्देशन करण्याचे आहे.
तीन सदस्यांच्या नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठरावः**

**१) प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्राचार्य पवार एस. के. यांनी अनुमोदन दिले. तसेच श्री. सलगर बी. एस. यांनी डॉ. शेख ए. ए. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी अनुमोदन दिले. एकापेक्षा जास्त नावे सुचविण्यात आल्याने गुप्त मतदान घेण्यात आले. डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांना ९ मते तर डॉ. शेख ए. ए. यांना ६ मते मिळाली त्यानुसार डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांचे ५० (२) (b) नुसार स्थायी समितीवर शिक्षकातून नामनिर्देशन झाले.**

**२) प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी प्राचार्य पवार एस. के. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. तसेच डॉ. सुर्यवंशी ए. बी. यांनी डॉ. शिळीमकर टी. एन. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. शेख ए. ए. यांनी अनुमोदन दिले. एकापेक्षा जास्त नावे सुचविण्यात आल्याने गुप्त मतदान घेण्यात आले. प्राचार्य पवार एस. के. यांना ९ मते मिळाली तर डॉ. शिळीमकर टी. एन. यांना ६ मते मिळाली. त्यानुसार ५० (२) (b) नुसार स्थायी समितीवर प्राचार्य पवार एस. के. यांचे नामनिर्देशन झाले.**

**३) व्यवस्थापन परिषदेवर महिला संस्था प्रतिनिधीची जागा रिक्त असल्याने स्थायी समितीवरील महिला संस्था प्रतिनिधीच्या नामनिर्देशनाची जागा रिक्त ठेवण्यात आली.**

**[ १४ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५७ (३) (a) नुसार एका सदस्याचे व ५७ (३) (b) नुसार दोन सदस्याचे यापैकी एक अनुसूचित जमाती / अनुसूचित जाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती / इतर मागास प्रवर्ग यातील चक्रीय पध्दतीने तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशनास्तव.**

(टिपणी :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - मध्य उप - विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि. १८ ऑगस्ट २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या विविध अधिकारमंडळांचा कार्यकाल दि.३१/०८/२०१० रोजी संपुष्टात आलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५७ (३) (a) नुसार प्र-कुलगुरु नसल्यास व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून एका सदस्याचे जो तक्रार निवारण समितीचा अध्यक्ष असेल व ५७ (३) (b) नुसार दोन सदस्याचे यापैकी एक अनुसूचित जमाती / अनुसूचित जाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती / इतर मागास प्रवर्ग यातील चक्रीय पध्दतीने तक्रार निवारण समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन करण्याची तरतूद आहे.

Maharashtra University Act 1994 Section 57 (3) -

(a) The Pro- Vice-Chancellor, where there is no Pro - Vice Chancellor, a member of the Management Council nominated by the Management Council. . . Chairman

(b) [Two] members of the Management Council nominated by the Management Council from amongst themselves, (one of them belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (*Vimukta Jatis*)/ Nomadic Tribes or Other Backward Classes, by rotation)

या तरतूदीनुसार नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव:**

**१) डॉ. सुर्यवंशी ए. बी. यांनी श्री. सलगर बी. एस. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. कदम एस. डी. यांनी अनुमोदन दिले. तसेच प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्राचार्य पवार एस. के. यांनी अनुमोदन दिले. एकापेक्षा जास्त नावे सुचविण्यात आल्याने गुप्त मतदान घेण्यात आले. श्री. सलगर बी. एस. यांना ६ मते मिळाली तर प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांना ९ मते मिळाली. त्यानुसार ५७ (३) (a) नुसार तक्रार निवारण समितीवर प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांचे नामनिर्देशन झाले.**

**२) प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांनी अनुमोदन दिले. तसेच डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी डॉ. शिळीमकर टी. एन. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. शेख ए. ए. यांनी अनुमोदन दिले. एकापेक्षा जास्त नावे आल्याने गुप्त मतदान घेण्यात आले. प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांना ९ मते मिळाली तर डॉ. शिळीमकर टी. एन. यांना ६ मते मिळाली. त्यानुसार ५७ (३) (b) नुसार इतर सदस्य म्हणून प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांचे नामनिर्देशन झाले.**

**३) प्राचार्य पवार एस. के. यांनी प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांचे नाव सुचविले आणि त्यास श्री. गायकवाड बी. आर. यांनी अनुमोदन दिले. तसेच श्री. सलगर बी. एस. यांनी डॉ. सुर्यवंशी ए. बी. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. शेख ए. ए. यांनी अनुमोदन दिले. एकापेक्षा जास्त नावे सुचविण्यात आल्याने गुप्त मतदान घेण्यात आले. प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांना ९ मते मिळाली तर डॉ. सूर्यवंशी ए. बी. यांना ६ मते मिळाली. त्यानुसार ५७ (३) (b) नुसार OBC प्रवर्गातून प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांचे नामनिर्देशन झाले.**

**[ १५ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (२) (a) (v) नुसार तीन सदस्यांचे वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (२) (a) (v) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून तीन सदस्यांचे वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्याचे आहे.

या तरतूदीनुसार नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठरावः**

**१) प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी प्राचार्य पवार एस. के. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले.**

**२) डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांनी डॉ. लोणीकर एस. व्ही. यांचे नाव सुचविले आणि त्यास श्री. गायकवाड बी. आर. यांनी अनुमोदन दिले.**

**३) डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी श्री. गायकवाड बी. आर. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी अनुमोदन दिले.**

**इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्याने वित्त व लेखा समितीवर ७५ (२) (a) (v) नुसार, प्राचार्य पवार एस. के., डॉ. लोणीकर एस. व्ही. व श्री. गायकवाड बी. आर. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १६ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (३) (b) (iii) नुसार दोन सदस्यांचे खरेदी समितीवर नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (३) (b) (iii) व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे खरेदी समितीवर नामनिर्देशन करण्याचे आहे.

या तरतूदीनुसार नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठरावः**

**१) डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांचे नाव सुचविले आणि त्यास प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी अनुमोदन दिले.**

**२) प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी श्री. गायकवाड बी. आर. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांनी अनुमोदन दिले.**

**इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्याने खरेदी समितीवर ७५ (३) (b) (iii) नुसार प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. व श्री. गायकवाड बी. आर. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

दि.१४ डिसेंबर, २०१० रोजी राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) कडून मा.कुलगुरु यांना मानद कर्नल रँक बहाल करण्यात आली. याबद्दल मा.कुलगुरु यांच्या अभिनंदनाचा ठराव प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी मांडला व त्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी अनुमोदन दिले.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे** | **डॉ. बा. पां. बंडगर** |
| **सचिव, व्यवस्थापन परिषद** | **अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद** |